# A.V.E.SOCIETYS
# DEGLOOR COLLEGEDEGLOOR
# DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
# B.A. THIRD YEAR




प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
पदवी व पदवुत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड ४३१७१७
इमेल : ratnakarlakshete1@gmail.com
Mobile No.: 9423439276

# बी.ए.तृतीय वर्ष
# भारताचे राजकीय विचारवंत

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

- प्रास्ताविक
- स्वातंत्र्य पूर्व काळातील भारतीय राजकारणात जहाल राष्ट्रवादाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पासून झाली .
- भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक होते .
- स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे तो मी मिळविणारच
- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अग्रगन्य पुढारी होते

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (२३ जुलै १८५६ – ०१ ऑगस्ट १९२०)




- जीवन परिचय
- २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे मराठी हिंदू
- चितपावन ब्राह्मण कुटुंबात जन्म झाला

# साहित्य आणि संशोधन

- आर्क्टिक होम ऑफ वेदाज
- ओरायन
- गीतारहस्य
- टिळक पंचांग पद्धती
- टिळकांची पत्रे, एम. डी. विद्वांस यांनी संपादित.
- वेदांचा काल व वेदांग ज्योतिष
- Selected documents of Lokamanya Bal Gangadhar Tilak, 1880-1920, रविंद्र कुमार यांनी संपादित केले आहे.
- The Hindu philosophy of life, ethics and religion (१८८७ मध्ये प्रकाशित).

# सामाजिक सुधारणांबाबत टिळकांचे विचार

- **महिला शिक्षणाबद्‌दल टिळकांचे विचार**
- **विवाहाचे वय व टिळकांचे विचार**
- **जातीचे निर्मूलन व गैर-ब्राम्हणांबद्‌दल टिळकांचे विचार**
- सार्वजनिक उत्सवांची सुरुवात

# टिळकांची चतुसुत्री

- स्वदेशी
- राष्ट्रीय शिक्षण
- बहिष्कार
- स्वराज्य

# टिळकांचे राजकीय विचार

- टिळकांच्या राजकीय जीवनाचे दोन कालखंड आहेत.
- राजकीय जीवनाच्या प्रथम कालखंडात ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणा आणि कामाची प्रशंसा करतात. ब्रिटिशांमुळे भारतात कायदा-सुव्यवस्था शिक्षण आणि राष्ट्रवादी विचारांचे बीजारोपण झाले.
- टिळकांची ब्रिटिश राजवट विषयी सुरुवातीच्या काळातील भूमिका नेमस्तांच्या भूमिकेशी मेळ खाणारी होती.
- टिळकांनी आपल्या राजकीय जीवनात सुरुवातीच्या काळात ब्रिटिश राजवटीचे समर्थन केले असले तरी नंतरच्या काळात आपली भूमिका बदलली. ब्रिटिश राजवटीवर कठोर टीका करू लागले.
- ब्रिटिश राजवटीला विरोध-
- 189697 च्या दुष्काळ निवारणाचा बाबत ब्रिटिशांनी फारसे प्रयत्न केले नाही.प्लेग निवारणाच्या काळात रँड व इतर अधिकाऱ्यांनी जनतेवर केलेला अन्याय रोखण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे टिळकांनी केसरी व मराठा वर्तमानपत्रात ब्रिटिशांनी वर टीका केली.
-

- लॉर्ड कर्झन यांनी केलेल्या बंगालची फाळणीमुळे टिळकांचा ब्रिटीश राजवटी वरील विश्वास उडाला.
- बंगालच्या फाळणीला विरोध करण्यासाठी टिळकांनी वंगभंग आंदोलनाला पाठिंबा दिला.
- कलकत्ता अधिवेशनात चतु:सूत्रीचा ठराव मांडून ब्रिटिशांविरोधात आक्रमक भूमिका घेतली.
- भारताचा राज्यकारभार ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या लहरीवर चालतो. भारतीयांना ते राजकीय क्षेत्रात अमानुष वागणूक देतात.
- प्रशासनातील वरिष्ठ जागांवर भारतीयांची नेमणूक करत नाही.
- ब्रिटिशांच्या आर्थिक शोषणामुळे भारतात दारिद्रय वाढते आहे.
- ब्रिटिश अधिकारी हुकूमशाही वृत्तीने वागतात.
- सरकारी पैशाच्या जोरावर चैनी व विलासी जीवन जगतात.
-

- ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीयांच्या सुखदुःखाशी देणेघेणे नाही.
- ब्रिटिश नोकरशाहीपासून देशाला वाचवण्यासाठी टिळकांनी जहाल वादी भूमिकेचा स्वीकार करून स्वराज्य प्राप्तीसाठी संघर्ष कर ण्याची जाहीर केले.
- **सामाज्यशाहीची मीमांसा-**
- टिळकांनी ब्रिटिश राजवटीची खरे स्वरूप सर्वांसमोर उघड केले.
- मवाळांच्या मांडणीतील कच्चे दुवे लक्षात घेऊन ब्रिटिश राजवटी च्या साम्राज्यशाही धोरणाची मीमांसा केली.
- ब्रिटिशांचा उदारमतवादी, न्यायवादी आणि लोकशाहीवादी असल्या चा दावा अमान्य केला.
- ब्रिटिशांच्या साम्राज्यशाही नीतीला विरोध करण्यासाठी जहालवादी राजकारणाचा अवलंब केला.
- ब्रिटिशांशी संघर्ष करण्यासाठी आवश्यक कार्यक्रम जनतेला दिला.
- ब्रिटिश साम्राज्यशाही विरोधात राष्ट्रीय चैतन्य निर्माण करून स्वराज्य मिळवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

# सांस्कृतिक राष्ट्रवाद-

- टिळकांनी भारतीय संस्कृतीच्या आधारावर राष्ट्रवादाची मांडणी केली.
- गणेशोत्सव आणि शिवजयंतीच्या माध्यमातून हिंदू समाजात ए कात्मता निर्मितीचे प्रयत्न केले.
- राष्ट्रप्रेमाचा धर्माची जोड देऊन हिंदूंच्या परंपरांना राष्ट्रीय परंपरे त जागा मिळवून दिली.
- टिळक सनातन धर्म, ऐतिहासिक परंपरा व संस्कृतीच्या आधारा वर राष्ट्रवादाची बीजारोपण करण्याचा प्रयत्न करतात.
- भारतीय राष्ट्रवादाचे मूळ पाश्चिमात्य संस्कृती नसून भारतीय संस्कृती असल्याचे नमूद करतात.
- लोकांच्या धार्मिक भावनांचा वापर करून राष्ट्रीय कार्यासाठी प्रवृ त्त करणे हे टिळकांच्या राष्ट्रवादाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.
- भारतासारख्या विविधता असलेल्या देशात सांस्कृतिक आणि आ ध्यात्मिक आधारावर राष्ट्रवादाची स्थापना करता येईल.

- टिळकांनी हिंदू धर्मीयांच्या संघटनावर भर दिला.
- हिंदू परंपरांना श्रेष्ठ मानून त्यांची राष्ट्रीय पातळीवर स्थापना करण्याचा प्रयत्न केला.
- टिळकांसमवेत सर्व जहाल नेते ब्रिटिश आक्रमणाला सांस्कृतिक आक्रमण मानत होते.
- स्वातंत्र्य चळवळीचा विचार निव्वळ राजकीय सत्ता ब दद्ल न मानता नैतिक आणि अध्यात्मिक मुक्तीचा मोर्ग मानत होते.
- टिळकांनी धर्माच्या आधारावर राष्ट्रवादाची मांडणी केलेली असली तरी परधर्मीयांच्या द्वेष केला नाही. लीग सोबत लखनौ करार घडवून आणण्यात पुढाकार घेतला.
-

- टिळक हिंदू धर्माकडे भारतीयांना एकत्र आणणारा घटक म्हणून पाहतात.
- हिंदू धर्मातील सामर्थ्य, बहुविविधता आणि स्वातंत्र्याला असलेले महत्त्व सर्वांना लक्षात आणून देतात.
- हिंदू धर्म ग्रंथांना राष्ट्रीय ठेवा म्हणतात.
- हिंदूंच्या समान सांस्कृतिक वारसाच्या आधारावर विविध पंथीयांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करतात.
- टिळकांच्या राष्ट्रवादावर भारतीय संस्कृती वेदातील अद्वैत वाद आणि मॅल्लिनी बर्क इत्यादींचा प्रभाव दिसून येतो.
- दादाभाई नौरोजी यांच्या आर्थिक शोषण सिद्धांताला आपल्या राष्ट्रवादात स्थान देतात.
-